वाटचाल
ग्रामविकासाकडे...

# कृषि विभाग


खत साठा तपासणी


कृषि यांत्रिकीकरण




पिक संरक्षण


बनाना ट्रेन

# विभागामार्फत राबविण्यात येणा-या योजना

## विशेष घटक योजना, आदिवासी उपयोजना व आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना अभिकरण योजना

## राष्ट्रीय बायोगॅस विकास कार्यक्रम

१.केंद्र पुरस्कृत गळीतधान्य, मका व ऊस विकास योजना

२.जिल्हा नियोजन व विकास मंडळ पुरस्कृत पिक संरक्षण योजना

३.केंद्र तृणधान्य विकास कार्यक्रम

## केंद्र पुरस्कृत कृषि अभियांत्रिकीकरण योजना

## जिल्हा परिषद निधी अंतर्गत ५० टक्के अनुदानावर योजना

## अपांरपारिक ऊर्जा

# कृषि विभाग

जळगांव जिल्हयाचे भौगोलिक क्षेत्र ११,६३,८९८ हेक्टर आहे. त्यापैकी खरीप पिकाखालील क्षेत्र ८,३०,८३६ हेक्टर, रब्बी पिकाखालील क्षेत्र १,०८,२२२ हेक्टर व उन्हाळी पिकाखालील क्षेत्र ६,१६३ हेक्टर आहे. जिल्हयाचे हवामान सर्वसाधारणपणे उष्ण असून हवामान उष्ण व कोरडे असल्याचे आढळते. जिल्हयाचे सरासरी पर्जन्यमान ६६३.३० मिलीमीटर आहे. पावसाचे प्रमाण उत्तरेकडून दक्षिणेकडे कमी होत जाते. उत्तर भागात सुमारे ६०० ते ७०० मिलीमीटर पाऊस पडतो. तर उर्वरीत भागात ४०० ते ५०० मिलीमीटर पाऊस पडतो.

जिल्हयाचे ओलीताखालील क्षेत्र एकूण लागवडी खालील निव्वळ क्षेत्राच्या ३५.०७ टक्के (२,९४,९६८ हेक्टर) असून जिरायत क्षेत्र ६४.७४ टक्के (५,४१,५८३ हेक्टर) आहे. तृणधान्य पिकाखालील क्षेत्र १,५८,१६० हेक्टर, कडधान्य पिकाखालील ९७,४६६ हेक्टर व तेलबिया पिकाखालील २५,९३५ हेक्टर क्षेत्र आहे. कापूस पिकाखालील ५,४८,५७० हेक्टर, उस पिकाखालील एकुण क्षेत्र १०,०७६ हेक्टर (सन २०११) असुन फळबाग क्षेत्र ३०,००० हेक्टर आहे. कापूस, मका व केळी या पिकांचे क्षेत्रात वाढ होत आहे. खरीप हंगामामध्ये प्रामुख्याने कापूस, मका, ज्वारी, उडीद, मुग, सोयाबीन व रब्बी हंगामामध्ये गहु, हरभरा, ज्वारी व मका इत्यादी पिकांचे उत्पादन घेतले जातात.

## विशेष घटक योजना, आदिवासी उपयोजना व आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना अभिकरण योजना-

या योजनेमध्ये अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती संवर्गातील शेतक-यास दोन वर्षात जास्तित जास्त १ लक्ष रुपये नविन विहिरीसाठी किंवा इतर बाबींसाठी ५० हजार रुपयांचा लाभ देण्यात येतो.

## लाभार्थींना द्यावयाच्या अनुदान बाबी

| अ.क्र | बाब | अनुदान मर्यादा रु. |
|---|---|---|
| १ | प्रात्यक्षिकासाठी निविष्ठा वाटप (१ हेक्टर मर्यादेत) | ५,०००/- |
| २ | पिक संरक्षण / शेतीची सुधारीत औजारे | १०,०००/- |
| ३ | जमिन सुधारणा (१ हेक्टर मर्यादेत) | ४०,०००/- |
| ४ | बैलजोडी / रेडेजोडी (स्थानिक बाजार भावानुसार) | ३०,०००/- |
| ५ | बैलगाडी | १५,०००/- |
| ६ | जुनी विहिर दुरस्ती | ३०,०००/- |
| ७ | इनवेल बोअरींग (नाबार्डच्या निकषानुसार) | २०,०००/- |
| ८ | पाईप लाईन (३०० मी. पर्यंत व नाबार्डच्या निकषानुसार) | २०,०००/- |
| ९ | पंपसंच | २०,०००/- |
| १० | नविन विहिर (रोहयो अंतर्गत जवाहर विहिर योजनेनुसार) | ७०,०००/-ते १,००,०००/- |
| ११ | शेततळे | ३५,०००/- |
| १२ | परसबाग कार्यक्रम (फलोत्पादन विभागाच्या निकषानुसार) - | प्रती लाभार्थी २००/ |
| १३ | तुषार / ठिबक सिंचन संच पुरवठा (प्रती हेक्टर) | २५,०००/- |
| १४ | ताडपत्री (प्रती लाभार्थीच्या मर्यादेत) | १०,०००/- |

## राष्ट्रीय बायोगॅस विकास कार्यक्रम :-

केंद्र शासनाच्या अपारंपारिक उर्जास्त्रोत मंत्रालयाचे शासन निर्णयानुसार दि. १ नोव्हेंबर २००९ पासुन पात्र लाभार्थ्यांना बायोगॅस संयत्रे उभारण्यासाठी पुढील सुधारित दराप्रमाणे अनुदान देण्यात येते.

| | |
|---|---|
| २ ते ४ घन मीटर सयंत्रे | - रु.८,०००/- |
| १ घन मीटर सयंत्र | - रु.४,०००/- |
| सयंत्रास शौचालय जोडल्यास | - रु.१,०००/- |
| इंजिन जनरेटर इ. साठी वापर | - रु.५,०००/- |

लाभार्थी निवड करताना त्यांचेकडे तीन जनावरे, जागेचा ७/१२ व ८अ चा उतारा असणे आवश्यक आहे. भूमिहीन शेतकयांनाही लाभ देता येतो. बायोगॅस सयंत्र उभारणीचा अर्ज गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्याकडे करावा. त्यानुसार परिपुर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर लाभार्थ्याची निवड करण्यात येते. अनुदानाची रक्कम संयत्राची उभारणी झाल्यानंतर पंचायत समिती मार्फत देण्यात येते.

**१.केंद्र पुरस्कृत गळीतधान्य, मका व ऊस विकास योजना –**

गळीत धान्य विकास योजनेंतर्गत ५० टक्के अनुदानावर पिक सरंक्षण औजारे (नॅपसॅक व पॉवर स्प्रेपंप), सुधारीत कृषि औजारे (मल्टीपर्पज कल्टीव्हेटर व पल्टीनांगर), पिक संरक्षण औषधांचा व जिप्सम पुरवठा करण्यात येतो. सिंचनाची सोय असलेल्या शेतक-यांना महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळाकडून प्राप्त अनुदान मर्यादत एचडीपीई पाईपचा पुरवठा करण्यात येतो. शेतक-यांना मका विकास योजनेंतर्गत ५० टक्के अनुदानावर तणनाशके व एचडीपीई पाईप पुरविण्यात येतात. तसेच ऊस विकास योजनेंतर्गत २५ टक्के अनुदानावर रु. १५,०००/- च्या मर्यादेत सुधारित कृषि औजारांचा पुरवठा शेतक-यांना करण्यात येतो.

**२.जिल्हा नियोजन व विकास मंडळ पुरस्कृत पिक संरक्षण योजना –**

केळी पिकावरील करपा रोग नियंत्रणासाठी ५० टक्के अनुदानावर मॅन्कोझेब, हेक्झाकोनॅझोल व कार्बनडायझीम महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळाकडुन उपलब्ध अनुदान मर्यादेत या पंचायत समित्यांना पुरवठा करण्यांत आलेला आहे.

**३.केंद्र तृणधान्य विकास कार्यक्रम –**

रब्बी हगांमात महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाकडील अधिकृत विक्रेत्यांमार्फत शेतक-यांना अनुदानावर गहु प्रमाणित बियांणाच्या सुधारित वाणाचा पुरवठा करण्यात येतो. महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळास या संस्थेस वाटप करण्यात आलेल्या सुधारित वाणासाठी प्रति क्विंटल रु. ५००/- प्रमाणे अनुदान देण्यात येते.

## केंद्र पुरस्कृत कृषि अभियांत्रिकीकरण योजना –

केंद्र पुरस्कृत कृषि यांत्रिकीकरण योजनेंतर्गत ट्रॅक्टर, पॉवरटिलर व रोटाव्हेटर घेण्यासाठी अल्प-अत्यल्प भू-धारक, अनुसूचित जाती , अनु.जमाती, महिला शेतकरी व इतर महाभुधारक शेतकरी यांना शासनाने विहित केलेल्या टक्केवारीनुसार कृषि विभागाकडुन पुर्वपरवानगी घेऊन खरेदी केल्यावर अनुदान देण्यात येते.

| अ.क्र | बाब/तपशील | | अनुदान रक्कम रु | |
|---|---|---|---|---|
| | | केंद्र हिस्सा | राज्य हिस्सा | एकुण |
| १ | ट्रॅक्टर | २५ टक्के मर्यादित रु.४५०००/- | १७ टक्के मर्यादित रु.३०६००/- | ४२ टक्के मर्यादित रु.७५६००/- |
| २ | पावर टिलर | ४० टक्के मर्यादित रु.४५०००/- | १० टक्के मर्यादित रु.१२०००/- | ५० टक्के मर्यादित रु.५७०००/- |
| ३ | रोटाव्हेटर | ४० टक्के मर्यादित रु.२००००/- | १० टक्के मर्यादित रु.५०००/- | ५० टक्के मर्यादित रु.२५०००/- |
| ४ | ट्रॅक्टर चलीत औजारे | २५ टक्के मर्यादित रु.१००००/- | २५ टक्के मर्यादित रु.१००००/- | ५० टक्के मर्यादित रु.२००००/- |
| ५ | डिझेल इंजीन/ इले.मोटर | ५० टक्के मर्यादित रु.१००००/- | निरंक | ५० टक्के मर्यादिता रु.१००००/- |

## जिल्हा परिषद निधी अंतर्गत ५० टक्के अनुदानावर योजना –

जिल्हा परिषद निधीतून ५० टक्के अनुदानावर शेतक-यांना खालील साहित्यांचे वाटप करण्यात येते.

१. पिक संरक्षण औजारे (नॅपसॅक व पॉवर स्प्रेपंप) २. डिझेल

## अपांरपारिक ऊर्जा –

जळगांव जिल्हयात नवीन उद्याग धंदे निर्माण होत आहेत. त्यामुळे शिक्षण, व्यवसाय इ. मुळे नागरी सुविधांसाठी (वाहतूक, पाणी, दिवाबत्ती इ.) ऊर्जेची मागणी मोठया प्रमाणात वाढत आहे. अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतां पासून तयार होणा-या ऊर्जेचा वापर करण्यासाठी शासन प्रोत्साहन देत आहे. यामध्ये सौर ऊर्जा, पवन ऊर्जा,

औष्णिक ऊर्जा इत्यादीचा समावेश होतो.

जिल्हा परिषदेच्या कृषि, महिला व बालकल्याण, समाजकल्याण विभागांच्या जिल्हा परिषद निधीतून व जिल्हा नियोजन समिती मार्फत ग्राम पंचायत हद्दीत १०० टक्के अनुदानावर सौर पथ दिवे व सौर कंदील पुरविण्यात येतात.

**जळगांव जिल्हयातील प्रमुख कृषि संशोधन केंद्रे-**

| | |
|---|---|
| १.तेलबिया संशोधन केंद्र, जळगांव. | - ०२५७-२२५०८८८ |
| २.केळी संशोधन केंद्र, जळगांव. | - ०२५७-२२५०९८६ |
| ३.कृषि विज्ञान केंद्र, ममुराबाद, ता.जळगांव. | - ०२५७-२२००४६४ |
| ४.कृषि विज्ञान केंद्र, पाल, ता.रावेर. | - ०२५८४-२८८४३९ |
| ५.कृषि विद्यालय, जळगांव. | - ०२५७-२२५०९५२ |

## संपर्क –

| | |
|---|---|
| **ग्रामपंचायत** | **- ग्रामसेवक** |
| **पंचायत समिती** | **- कृषि अधिकारी / गट विकास अधिकारी** |
| **जिल्हा परिषद** | **- कृषि विकास अधिकारी** |

*नदी तळ्याकाठची स्वच्छता । तेथे पार, घाट आदिची व्यवस्था।*
*उत्पादन वाढवाया तत्वता। उपयोग घ्यावा जलाचा।।*

- ग्रामगीता